# अवयवदानाने दिले दोन दिवसांत ९ जणांना नवीन जीवन



मुंबई, दि. १२ (प्रतिनिधी) – अवयवदानाबाबत होत असलेल्या जनजागृतीचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. दोन दिवसांत चार अवयवदात्यांनी केलेल्या दानामुळे ९ जणांना नवीन जीवन मिळाले आहे. एकाला हृदय तर ८ जणांना विविध अवयव मिळाल्याने हे अवयवदान खऱ्या अर्थाने जीवनदान ठरत आहे.

वाशी येथील ३८ वर्षीय मृत व्यक्तीच्या अवयवदानाने चार जणांना जीवदान दिले. यापैकी एकाला यकृत आणि दोघांना किडनी तर एका ३६ वर्षीय तरुणाला हृदय मिळाले. गोदरेज रुग्णालयात ७८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने केलेल्या अयवदानाने दोघांना किडनी तर एकाला यकृत मिळाले. नानावटी रुग्णलयात ८० वर्षीय ज्येष्ठ नागरिक तसेच ५२ वर्षीय महिलेने केलेल्या अवयवदानाने दोघांना यकृत मिळाले. नायरसह विविध रुग्णालयांत या प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. या अवयवदानाने अनेक अंधांना नवीन दृष्टीही मिळाली आहे.

## पोलिसाचा आदर्श

नागपाडा पोलीस ठाण्यातील हवालदार नंदकिशोर नाईक यांनी अवयवदानाचा आदर्श घालून दिला आहे. नंदकिशोर यांची पत्नी शीला नाईक यांना गुरुवारी रात्री नानावटी रुग्णालयात ब्रेन डेड घोषित केले. मात्र त्यानंतरही खचून न जाता नाईक यांनी पत्नीचे अवयव दान करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी अवयवदानाची परवानगी दिल्यानंतर त्यांचे डोळे आणि यकृत या अवयवांचे अन्य रुग्णांमध्ये प्रत्यारोपण करण्यात आले.